CHE/DP/14
2014-15

( सोबत "पर्यावरणपूरक बांधकाम क्षेत्रासाठी मार्गदर्शक तत्वांच्या काटेकोर अंमलबजावणीबाबत" या विषयावरील संचालक, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या क्र. इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/ता.कं१, दिनांक १८ जानेवारी, २०१४ चे पत्र व सहपत्राची प्रत)

-------------------------------

MGR/18775
25/4/14
ब. न. पा. आयुक्त
CHE (DP)

ई-मेल-uddud20@gmail.com

क्रमांक : संकिर्ण- २०१४/सं.क्र.३६४/नवि-२०
नगर विकास विभाग, नवीन मंत्रालय,
४ था मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००१.
दि. २ एप्रिल, २०१४.

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहिसाठी,

१) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
२) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई (सर्व नगर परिषदांना कळविण्याच्या विनंतीसह)

( उदय ना. सार्दळ)
कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग

बृहन्मुंबई महानगरपालिका
आयुक्तांचे कार्यालय
19 APR 2014
समयः ११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८,
क्रमांक: MGR

प्रअ/००२३८०/विनि/साधा. दि. २८/०४/१४

उप प्रमुख अभि (विनि) ७/२
उप प्रमुख अभि (इप्र) ५३१/२/पू.ड./शहर

बृहन्मुंबई महानगर पालिका
प्रमुख अभियंता (विकास नियोजन)
यांचे कार्यालय
25 APR 2014
क्र.प्र.अ./वि.नि./ 02380
साधारण | शहर | पूर्व. उप | प. उप
मा. अधि. | टिडीआर | लेखा | आस्था

२८/०४/१४

प्रमुख अभियंता
(विकास नियोजन)
28/4/14

EEDP (H&K)
28/4/14

AO (DP) - II
to circulate to EE's, AB's, SB's
29/4

मु.लि (वि.नि.) साधारण
पत्रात उल्लेख केल्यानुसार मार्गदर्शक तत्वे (प्रपत्र 'अ') सोबत आढळून आले नाही. कृपया खात्री करून सर्व संबंधितांकडे परिपत्रित करावे.
A.O.(DP) II 02/05/2014

**No. CHE/ 2380 /DP/Gen. dtd. 07/06/2014**

Ch.E.(D.P.)

Dy.Ch.E.(D.P.)-I / II/Dy.Ch.E.(B.P.)(City)/E.S./W.S.-I/W.S.-II

E.E.(D.P.)City/E.E.D.P.(E.S.)/E.E.(D.P.)W.S.H&K/P&R/E.E.P.to Ch.E.(D.P.)

E.E.(B.P.)City I/II/III/E.E.B.P.(E.S.) I/II/ E.E.B.P.(W.S.) H&K (P&R_

A.E.(D.P.) ................................ / S.E. (D.P.) ..................................

Copy forwarded for information & further necessary action please

6/6/14

**Administrative Officer**
**(Development Plan)**

**पर्यावरणपूरक बांधकाम क्षेत्रासाठी**
**मार्गदर्शक तत्वे**

# महाराष्ट्र शासन

## पर्यावरण विभाग

शासन निर्णय क्रमांक:- इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/तां.क.१
नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:-१० जानेवारी, २०१४.

प्रस्तावना:-

विकासकामे व मूलभूत सोयीसुविधा पुरविण्याच्या अनुषंगाने बांधकाम क्षेत्रामध्ये झपाट्याने वाढ होत आहे. बांधकाम प्रक्रीयेमध्ये मोठ्या प्रमाणात नैसर्गिक संसाधनांचा वापर करण्यात येतो. या प्रक्रियेत नैसर्गिक संसाधनांच्या अनिर्बंध वापरामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडत असून त्याचा वातावरणावरही विपरित परिणाम होत आहे.

राज्यात नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर, सुयोग्य कचरा व्यवस्थापन, हरितगृह वायू उत्सर्जनात संतुलन साधण्यासाठी तसेच जीवनमानात सुधार करण्याच्या अनुषंगाने **पर्यावरणपूरक इमारत बांधकाम क्षेत्रासाठी मार्गदर्शक तत्वे** कॉनफीडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री, इंडियन ग्रीन बिल्डींग कौंसिल, सर्व महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग व क्षेत्रिय यंत्रणांबरोबर विचारविनिमय करुन तयार करण्यात आल्या आहेत. सदर मार्गदर्शक तत्वांच्या अंमलबजावणीमुळे, ऊर्जा वापरात तसेच पाणी वापरात अनुक्रमे २०-३०% व १५-२०% बचत होणे अपेक्षित आहे. तसेच बांधकामाच्या वेळी २०-३०% कमी कचरा उत्पादीत होऊन त्यानुषंगिक प्रदूषणास आळा बसणार आहे.

सदर मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी संपूर्ण राज्यभर टप्प्याटप्प्याने करण्यात येणार असून प्रथमत: शासकीय इमारती/ निम-शासकीय इमारती / शासन अखत्यारितील इमारती यांसाठी सदर मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

स्थायी विकासप्रक्रियेत नैसर्गिक संसाधनांचे महत्त्व लक्षात घेऊन तसेच 'हरित इमारत' संकल्पनेला प्रोत्साहन देऊन, पर्यावरण संवर्धन व शाश्वत विकास साधण्यासाठी पर्यावरणपूरक इमारत बांधकामासाठी मार्गदर्शक तत्वे सदर शासन निर्णयाव्दारे निर्गमित करण्यात येत आहेत.

२. पर्यावरणपूरक मार्गदर्शक तत्वांमध्ये खालील सहा घटकांचा समावेश करण्यात आला आहे.

१. बांधकाम स्थळ, परिस्थितीकी आणि वाहतूक
२. पाण्याचे कार्यक्षम व्यवस्थापन, सांडपाणी प्रक्रिया व पुनर्वापर
३. ऊर्जेचा कार्यक्षम वापर
४. अपारंपारिक ऊर्जा वापर
५. कचरा व्यवस्थापन
६. इमारत बांधकाम साहित्य

**३. मार्गदर्शक सूचनांमधील प्रमुख बाबी -**

**अ) सदर मार्गदर्शक तत्वांच्या अंमलबजावणीसाठी खालील इमारतींचा समावेश असेल**

- शासकीय / निम-शासकीय इमारती (Government / semi government buildings)
- शासन अखत्यारितील इमारती (Government undertakings)
- राज्य नोडल संस्था, जसे संचलनालय इ.(State nodal organizations)
- शासन अनुदानीत इमारती (Government aided buildings)
- शासकीय संस्थाद्वारे (Government Institutions) इमारत बांधकामे

- शासन अनुदानीत शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, शाळा, महाविद्यालये इ. (Government aided Educational Institutes, University, Schools, Colleges etc).
- महामंडळे, मंडळे, प्राधिकरणे, स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादीद्वारे करण्यात येणारी बांधकामे.

ब) सदर मार्गदर्शक तत्वे सोबत प्रपत्र अ प्रमाणे असून त्यांचे खालील प्रमाणे भाग करण्यात आले असून ते परिच्छेद ३(अ) मध्ये उल्लेख केलेल्या इमारतींना / बांधकामांना लागू करण्यात आले आहेत.

१. अनिवार्य बाबी (भाग-१)
२. ऐच्छिक बाबी (भाग-२)

सदर मार्गदर्शक तत्वे ज्योत्याच्या बांधकामास (Plinth Level) अनूमती देतांना व त्यापूढील इमारतीच्या बांधकामास (Final Level) अनूमती देताना अवलंबविण्याच्या बाबी अशा दोन भागात विभाजीत करण्यात आल्या असून त्यांची प्रत्येक टप्प्यात अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था, प्राधिकरण, महामंडळ, मंडळ, संस्था, शासकीय व निमशासकीय विभाग यांच्यावर असेल. अंतिम भोगवटा पत्र देण्यापूर्वी या निर्णयाद्वारे निर्गमित मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी झाल्याची खात्री या संस्थांद्वारे विभागास करण्यात येईल.

क) या तत्वांच्या अंमलबजावणीसाठी व संनियंत्रणासाठी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था, प्राधिकरण, महामंडळ, मंडळ, संस्था, शासकीय व निमशासकीय विभाग आवश्यकतेनूसार कार्यप्रणाली त्यांच्या स्तरावर ठरवतील.

४. परिच्छेद ३(अ) मधील सर्व प्रशासकीय व क्षेत्रिय यंत्रणांनी आपल्या अधिपत्याखालील कार्यक्षेत्रात सदर मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी सत्वर करणे अनिवार्य आहे.

**५ अंमलबजावणी यंत्रणा-**

५.१ बांधकाम प्रकल्पास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देताना संबधीत विभागाने प्रस्तावित बांधकामामध्ये या मार्गदर्शक तत्वांचा समावेश असल्याची खात्री करणे त्या विभागावर बंधनकारक आहे. याबाबतची खात्री करण्याची जबाबदारी संबंधीत विभागाच्या विभागप्रमुखांची असेल.

५.२ प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेनंतर अंमलबजावणी करणा-या क्षेत्रीय कार्यालयाच्या विभागप्रमुखावर काम सुरु करण्यापुर्वी या तत्वांची अंमलबजावणी झाल्याची खात्री करुन तशी नोंद ठेवण्याची जबाबदारी असेल.

५.३ संबधीत स्थानिक स्वराज्य संस्था/ प्राधिकरण / शासकीय मंडळ/ महामंडळ यांनी काम प्रांरभ प्रमाणपत्र/संमतीपत्र व काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र/ संमतीपत्र देण्यापूर्वी या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी केल्याची खात्री केल्यानंतरच अशा परवानग्या दयाव्यात व प्रमाण पत्रामध्ये/ परवानगीमध्ये याबाबत खात्री केल्याचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

५.४ सदर मार्गदर्शक तत्वांच्या यथायोग्य अंमलबजावणीसाठी संबंधित प्रशासकीय विभाग, क्षेत्रिय यंत्रणांनी त्यांच्या कार्यप्रणाली, तत्संबंधी मॅन्युअल्स, उपविधी, दरसूची, अंदाजपत्रक इ. मध्ये आवश्यक ते बदल करुन या तत्वांचा त्यामध्ये याथायोग्य समावेश करण्यात यावा व त्यानुसार या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी.

६. या मार्गदर्शक तत्वांच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी- सुधारणांचा, हे आदेश लागू झाल्यापासून एक वर्षानंतर आढावा घेण्यात येईल. सर्व संबंधित यंत्रणा यानुसार त्यांच्या काही सूचना वा सुधारणा असल्यास त्या शासनास या कालावधी दरम्यान कळवतील.